# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : जीईएन (विस)-२०२४/प्र.क्र.४६/२४/३३ निवडणूक (१)
सामान्य प्रशासन विभाग,
कक्ष क्र .६११, ६वा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४.

**प्रति,**

**१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.**
**२. विभागीय आयुक्त, सर्व.**
**३. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता)**
**४. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.**
**५. सचिव (१) कार्यभार, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.**
**६. विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व.**

**विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४-**
**भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेला विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम प्रसिध्द करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यातील विधानसभेच्या २८८ जागांकरिता विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**विधानभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४**

| | | |
|---|---|---|
| १ | निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २९ ऑक्टोबर, २०२४ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशन पत्रांची छाननी | दिनांक ३० ऑक्टोबर, २०२४ (बुधवार) |
| ४ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२४ (सोमवार) |
| ५ | मतदानाचा दिनांक | दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ (बुधवार) |
| ६ | मतमोजणीचा दिनांक | दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ (शनिवार) |
| ७ | निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक | दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ (सोमवार) |

प्रस्तुत प्रसिध्दीपत्रक जाहीर झाल्यापासून महाराष्ट्र राज्यांमध्ये आदर्श आचारसंहिता देखील लागू झालेली आहे.तरी, प्रस्तुत निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवडणूकीचे संचलन करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**आपला,**

**(म. रा. पारकर)**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य**

**सोबत :- वरील प्रमाणे**
**प्रत:- उपजिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व.**

C:\# RAHUL 2024\विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024.docx